# प्रेसनोट

वनपाल कार्यालय, नेरूर तर्फ हवेली, ता कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील वनपाल श्री. राठोड यांनी लाचेची मागणी केल्याने त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले बाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | सिंधुदुर्ग |
| पोलीस ठाणे | कुडाळ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. अनिल हिरामन राठोड, वनपाल, नेरूर तर्फ हवेली, ता. कुडाळ, जि.सिंधुदुर्ग |
| मागणी केलेली लाच रक्कम | १५,०००/— रूपये |

**थोडक्यात हकीगत:-**

यातील तक्रारदार हे लाकुड व्यवसायिक असुन त्यांनी श्रीमती चव्हाण यांच्या मालकीची मु.पो. तुळसुली, ता. कुडाळ येथील झाडे वनविभागाच्या परवानगीने लाकुड माल तयार केला होता. त्या मालाची वाहतुक करणेची परवानगी मिळणेकरीता, वनपाल कार्यालय, नेरूर तर्फ हवेली येथे दि. १५/०२/२०२४ रोजी अर्ज दिलेला होता. त्या अनुषंगाने लाकुड वाहतुकीच्या पास देणेकरीता वनपाल राठोड यांनी लाकडु तोडीचे व वाहतुकीचे मिळुन २० हजार रू. तक्रारदार यांचेकडे मागितल्याने त्यांना लोकसेवक श्री. राठोड यांची अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग यांचेकडे दिनांक २९/०२/२०२४ रोजी लेखी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २९/०२/२०२४ रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता लोकसेवक श्री. राठोड, वनपाल नेरूर यांनी श्रीम. चव्हाण यांच्या मालकीवी मु.पो. तुळसुली, ता. कुडाळ येथील जमिनीच्या लाकुडतोड प्रकरण व लाकुड वाहतुकीचा पास देणेकरीता १५,०००/- रू. लाचेची मागणी केलेली असल्याने लोकसेवक श्री. राठोड यांचेविरूध्द आज दिनांक ०१/०३/२०२४ रोजी लाचेचा सापळा आयोजीत केला असता श्री. राठोड यांना तक्रारदार यांचेकडुन १५,०००/- रू. लाच स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आलेले असुन श्री. अनिल हिरामन राठोड, वनपाल, नेरूर तर्फ हवेली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ संशोधन २०१८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करीत आहोत.

वरील कारवाई श्री. अरूण पवार, पोलीस उपअधीक्षक, अेसीबी सिंधुदुर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. अमितकुमार पाटील, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदूर्ग यांचेकडून करण्यात आलेली आहे.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग यांचेशी संपर्क करावा.**

---

**मार्गदर्शन अधिकारी— मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र ठाणे.**
**मा. श्री. महेश तरडे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि ठाणे परिक्षेत्र ठाणे**

संपर्क पत्ता :—ला.प्र.वि. सिंधुदुर्ग, कुडाळ तहसीलदार कार्यालयासमोर, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, (४१६५२०)
संकेतस्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई—मेल :— dyspacbsindhudurga@gmail.com
ऑनलाईन तक्रार :— acbmaharashtra.net
टोल फ्री नंबर :— १०६४
दुरध्वनी क्र. :— ०२३६२—२२२२८९

पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग

(अमितकुमार पाटील)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग

Scanned with OKEN Scanner